# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दि.१८ मे,२०२२

जळगाव दि.१८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांच्या प्राचार्या समवेत बुधवार दि.१८ मे रोजी रुसाचे राज्य प्रकल्प संचालक तथा महाराष्ट्र राज्य अध्यापक प्रशिक्षण संस्था, पुणेचे कार्यकारी संचालक डॉ.निपुण विनायक यांनी संवाद साधला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी होते.

राज्य अध्यापक प्रशिक्षण संस्थेच्यावतीने संलग्नीत महाविद्यालयातील शिक्षकांसाठी प्रशिक्षण दिले जाणार असून नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजाणीसाठी त्याचा उपयोग होणार असल्यामुळे शिक्षकांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन यावेळी डॉ.निपुण विनायक यांनी केले. अध्यक्षीय भाषण प्रा.माहेश्वरी यांनी नवीन शैक्षणिक धोरणाविषयी चर्चा केली. यावेळी मंचावर रूसाचे उपसंचालक राहूल कदम, प्रभारी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, सहसंचालक डॉ.संतोष चव्हाण, तंत्रशिक्षण सह संचालक डॉ.डी.पी.नाथे, प्रभारी कुलसचिव डॉ.किशोर फ.पवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.सुनील पाटील यांनी केले.

दुपारच्या सत्रात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर डॉ.अनिल डोंगरे, पदवीस्तरावरील सामाईक प्रवेश पुर्व परीक्षा, आणि द्विपदवी कार्यक्रम याबाबतीत प्रा.एस.आर. चौधरी यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार सादरिकरण केले. प्रभारी प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे अध्यक्षस्थानी होते. यावेळी अधिष्ठाता प्राचार्य आर.एस.पाटील, प्राचार्य पी.एच.पवार यांनी मार्गदर्शन केले. सुत्रसंचलन प्रा.किशोर पवार यांनी केले. आभार डॉ. मधुलिका सोनवणे यांनी मानले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी